
9329

१४

# भगवान महावीर

हम्पा नागराजय्या

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : ध्या.त्रा.
दा. क्र. ९३२९



BVBK-0401321

वाच. बा. वा.
१३२१
धा/८

पुष्प १४

# भगवान महावीर

लेखक

**हम्पा नागराजय्या**

अनुवादक

**ना. ग. बैतुले**

BVBK-0401321

मुख्य सम्पादक

**एल. एस. शेषगिरिराव**

भारत-भारती [मराठी संस्करण]
रुईकर पथ, नागपूर-२

प्रकाशक
भारत-भारती [मराठी संस्करण] बाल पुस्तकमाला

प्रभाकर फंजपुरकर
मंत्री
श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिति
रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

सम्पादक, मराठी संस्करण
सुरेश दत्तात्रेय देशपांडे

प्रथम संस्करण मार्च १९८१

मूल्य रु. २–००

मुद्रक
दि. भि. धाक्रस
नाग मुद्रणालय, रुईकर पथ, नागपूर–२

९३२९ दि-५।१।८२

# थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनाच्या अभ्यासातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोट्या-छोट्या पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती'ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जवाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

आपला हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपल्यालाही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत
**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**
सम्पादक

# भगवान महावीर

जैन पंथाचे अनुसरण करण्यासाठी सत्ता, पद आणि संपत्ती यांचा त्याग करणारा हा तरुण राजपुत्र वर्धमान. बारा वर्षे कठोर तप करून त्याने लक्षावधी लोकांना प्रकाश दाखविला. तो स्वतःच त्यांच्यासाठी प्रकाशरूप झाला.

⊙ ⊙

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

आपला हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपल्यालाही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत
**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**
सम्पादक

## भगवान महावीर

जैन पंथाचे अनुसरण करण्यासाठी सत्ता, पद आणि संपत्ती यांचा त्याग करणारा हा तरुण राजपुत्र वर्धमान. बारा वर्षे कठोर तप करून त्याने लक्षावधी लोकांना प्रकाश दाखविला. तो स्वतःच त्यांच्यासाठी प्रकाशरूप झाला.

९३२९/दि५।१।८२

# भगवान महावीर

कुंडपूर हे वैशालीचे उपनगर आणि लिच्छवी गणतंत्राची राजधानी. या उपनगराच्या आसमंतात वटवृक्षांचे मोठे वन होते. त्यामधोमध एक विशाल वटवृक्ष होता.

सकाळची वेळ. मुले वटवृक्षाच्या फांद्यांवर चढून बसलेली. ती आपल्या खेळात इतकी धुंद झालेली की, दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे त्यांचे लक्ष नव्हते. जगाचा त्यांना जणू विसर पडला होता. झाडाखाली उभा असलेला एक मुलगा वर पाहत एकाएकी ओरडला–'अरे साप, साप, अजगर !' आणि हातातली काठी फेकून तो पळून गेला.

झाडावर चढलेली मुले घाबरली. तो अजगर हळूहळू खाली सरकत होता. हे पाहून साऱ्या मुलांनी खाली उड्या टाकल्या आणि नगराकडे पळायला सुरुवात केली.

**धाडसी राजपुत्र**

थोड्या अंतरावर जाऊन त्यांपैकी काहीजण थांबले व मागे वळून पाहू लागले. तेवढ्या अंतरावरूनही तो अजगर त्यांना दिसत होता. त्याच्याजवळ आणखीही काहीतरी दिसत होते. काय होते ते ? खूप लक्षपूर्वक पाहिल्यावर त्यांना दिसले की, तिथे एक मुलगा बसला आहे. अगदी निर्भयपणे. केवढे धाडस ! कोण होता बरे तो ? वडाच्या फांदीवर बसलेला मुलगा दुसरा कोणी नसून राजपुत्र वर्धमान होता.

काही मुलांनी हे वृत्त राजवाड्यापर्यंत पोचविले. महाराज, महाराणी आणि त्यांचे रक्षक धावतच तिथे आले.

वटवृक्षावर बसून राजकुमार वर्धमान अजगराची प्रत्येक हालचाल एकटक टिपत होता. अजगरही राजकुमाराला भयभीत करण्याचा प्रयत्न करीत होता; पण मनातून घाबरला होता. एकदम त्याने फुत्कार सोडला. क्रोधाने आपली जीभ लपकावली. जणू धमकी देत आहे अशा नजरेने राजपुत्राकडे तो पाहत होता. कोणत्याही

क्षणी त्याच्यावर चालून येण्यास जय्यत तयार असावा, असा आवाज काढत होता, आपली शेपटी अशी काही फटकारत होता की, वर्धमानाचा कोथळाच बाहेर यावा! परंतु तो धैर्यशाली राजपुत्र अचल पर्वतासारखा स्थिर बसून राहिला. अजगराने अखेर पराभव स्वीकारला. राजमहाला-तील पायऱ्यांवरून उतरावे तसा वर्धमान वडाच्या त्या फांदीवरून उतरू लागला.

राजपुत्राच्या या निर्भयतेने आणि साहसाने सारेच प्रेक्षक आश्चर्यचकित झाले. त्याच्या माता-पित्यांना वाटले की, मृत्यूच्या दाढेतून आपण स्वतःच सुखरूप परतलो! वर्धमानाला त्यांनी आपल्या मिठीत घेतले. त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले. त्या दिवसापासून राजपुत्र वर्धमान महावीर नावाने प्रसिद्ध झाला.

**लिच्छवींचा चेतक**

सांप्रतच्या विहार राज्यात चंपारण्य, मुज-फ्फरपूर, दरभंगा आणि सारण जिल्हे आहेत.

अडीच हजार वर्षांपूर्वी हा प्रदेश वृजींचा देश होता. अर्थात् ती लिच्छवींची भूमी होती. त्याचेच विदेह हे दुसरे नाव होते. त्या काळची त्याची राजधानी वैशाली ही एक सुप्रसिद्ध नगरी होती. गंडकी नदी वैशालीमधून वाहत होती. तिच्या दोन्ही काठावर उपनगरे होती. त्यापैकी एक होते क्षत्रीयकुंडग्राम व दुसरे ब्राह्मणकुंडग्राम. क्षत्रीय-कुंडग्राम कुंडपूर म्हणून प्रख्यात होते.

हे लिच्छवीचे गणराज्य होते. एकमताने निवडून आलेला या गणराज्याचा प्रतिनिधी 'गणराज' म्हणून ओळखला जात असे. तिथे राजादेखील होता. परंतु राज्यशासन चालविताना गणराजाच्या सल्ल्यावर व संमतीवर त्याची श्रद्धा असे. वैशालीच्या लिच्छवींमध्ये एकी होती. सर्व समस्या ते एकत्र विचारविमर्श करून सोडवीत. त्यांच्या या एकीमुळे शत्रू त्यांना भीत.

एकदा मगधाचा राजा अजातशत्रू याने लिच्छवींवर आक्रमण करण्याचा विचार केला. त्याबावत सल्ला घ्यायला तो बुद्धांजवळ गेला.

भगवान बुद्धाने सल्ला दिला, “ जोवर लिच्छवी एकत्र येऊन विचारविनिमय करतील, सर्व-संमतीने निर्णय घेतील, नियमांचे उल्लंघन करणार नाहीत, वरिष्ठांचे आज्ञापालन करतील, स्त्रियांना आदरस्थान मानतील, जैन मंदिरात (चैत्यांमध्ये) जातील, पूजा करतील, साधुसंतांना मान देतील, तोवर त्यांचे कोणीच वाकडे करू शकणार नाही. यानंतर अजातशत्रूने लिच्छवींवरील आक्रमणाचा विचार सोडून दिला.

वैशालीचा चेतक नावाचा सुप्रसिद्ध राजा होता. काशीची लहान लहान राज्ये व कोसलची नऊ लिच्छवी राज्ये त्याच्या आधिपत्याखाली होती. त्याला सात राजकन्या होत्या.

चेतक आपल्या निकटवर्ती राज्यांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करू पाहत होता. त्याने आपल्या राजकन्यांचे विवाह महत्त्वाच्या व्यक्तींबरोबर केले. सुज्येष्ठाने फक्त विवाह केला नाही. ती जैनदीक्षा घेऊन संन्यासिनी झाली.

त्रिशला चेतकाची ज्येष्ठ राजकन्या होती.

(श्वेतांवर जैनांच्या मते ती त्याची भगिनी होती.) ती नित्य सत्कार्य करीत असे. म्हणून तिला 'प्रियकारिणी' म्हणत. सर्व गणराजांमध्ये चेतक सिद्धार्थाला अधिक मान देत असे. त्याचा त्याच्यावर अधिक विश्वास होता. सिद्धार्थ कुंड-पूरचा गणराज होता. कुंडपूर त्यावेळी व्यापार-नगरी होती. सिद्धार्थ जैनधर्माचा व लिच्छवींच्या 'ज्ञातृ' पंथाचा होता. ज्ञातृपंथाचे लिच्छवी क्षत्रीय होते. त्यांना मांसाशन व सुरापान वर्ज्य असे. म्हणून चेतकाने ज्येष्ठ राजकन्या प्रियकारिणी हिचा विवाह सिद्धार्थाशी केला.

## जैन धर्म

भारतात अनेक धर्म आहेत. त्यांच्यामुळे मानवजातीला आनंदाचा खरा मार्ग सापडतो. जैन धर्म (श्रवण मार्ग) हा त्यांच्यापैकी एक. जैनात ६३ श्रेष्ठ उपदेशक होऊन गेले. त्यांना 'त्रिषष्टी शलाका महापुरुष' म्हणतात. त्यात २४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ नारायण, ९ प्रतिनारायण, ९ वलदेव यांचा समावेश आहे. तीर्थंकर जिन, अर्हन्त ह्या नावानेदेखील विख्यात

आहेत. तीर्थंकरांत वृषभनाथ सर्वप्रथम होते. त्यांना पुरुदेव किंवा ऋषभदेव म्हणून देखील ओळखतात. वृषभनाथ तीर्थंकराच्या क्रमाने २३ वे अर्हंत होते. पार्श्वनाथांनी ज्या जैनधर्माची (निग्गंठ) शिकवण दिली, त्याचे अनुसरण लक्षावधी लोक करतात. चेतकाप्रमाणे सिद्धार्थ आणि प्रियकारिणी देखील पार्श्वनाथांच्या धर्म-शिक्षणाने प्रभावित झाली होती. त्यांनी आपले जीवन सत्कार्य व सद्विचार यात घालविले. त्यांनी कायावाचामनसा अहिंसेचे पालन केले.

## वर्धमानाचा जन्म

ग्रीष्म ऋतूच्या आरंभी प्रियकारिणी गर्भवती झाली. इ. सनापूर्वी ५९९ मध्ये सोमवारी सकाळी, चैत्रमासातील कृष्णपक्षात (ग्रीष्माच्या पहिल्या आठवड्यात) पुत्रजन्म झाला. सिद्धार्थाला ही वार्ता कळल्याबरोबर ·तो तिथे आला. दासींनी त्याला अंत:पुरात नेले. प्रियकारिणीच्या मंचका-शेजारी एक सुंदर पाळणा होता. त्यात नवजात बाळाला ठेवले होते. दोन श्रेष्ठ विभूतींनी जगतात प्रदीप्त केलेली ही ज्योती होती. तिच्या ठिकाणी

त्यांच्या आशा केंद्रित झाल्या होत्या. सिद्धार्थाने जेव्हा आपले विचार प्रियकारिणीस सांगितले तेव्हा साऱ्या प्रसवपीडेचा तिला विसर पडला.

अकराव्या दिवशी नामकरण संस्कार व्हायचा होता. सर्व कुंडपुरात आनंदोत्साहाचे वातावरण होते. जिकडे तिकडे गुढ्या उभारण्यात आल्या. तोरणपताकांनी सर्व स्थाने सजविण्यात आली. नागरिकांनी रात्री घरोघर दीपमाळा लावून दिवाळी साजरी केली.

सर्व प्रजाजनांना सुंदर उपहार देण्यात आले. कुंडपुरातील प्रत्येक व्यक्तीला एकेक सुवर्ण-मुद्रा मिळाली. क्षुधितांना भोजन मिळाले. कैद्यांना अन्नवस्त्रे देऊन सोडण्यात आले. सर्वांनी सिद्धार्थ-पुत्राला सुखसमृद्धीचा आशीर्वाद दिला. नागरिकांनी बालकाचे नाव वर्धमान ठेवले, पण त्याचे माता-पिता त्याला ' वीर ' म्हणून संबोधू लागले.

**उन्मत्त हत्तीवर विजय**

बाल वर्धमान दिवसेंदिवस शुक्लेन्दुवत् वाढू लागला. त्याने रांगायला सुरुवात केली. तो

बोवडे बोलू लागला. गोंडस तसाच तो चाणाक्षही होता. त्या पंचवर्षीय कुमाराला भीती कशी ती माहीत नव्हती. कुठेही केव्हाही तो बेडरपणे निघून जात असे. एकदा सवंगड्यांबरोबर खेळत असता त्या मैदानाभोवती एक हत्ती धावू लागला. वाटेत येणाऱ्या वस्तू आपल्या पायाने तो तुडवीत होता. सोंडेत धरून वाटेतल्या व्यक्तींना फेकू लागला. हे भयानक दृश्य पाहून वर्धमानाच्या मित्रांचा थरकाप उडाला. पळापळ सुरू झाली. परंतु वर्धमान धैर्याने तिथेच उभा राहिला. त्याला पकडण्यास हत्तीने आपली सोंड सरसावली. पण वर्धमान चपळाईने दूर सरकला. हत्तीने पुन्हा प्रयत्न केला. त्याच क्षणी वर्धमानाने पुढे येऊन हत्तीची सोंड हाताने पकडली व त्याच्या गुडघ्यावर पाय रोवून तो त्याच्या मानेवर चढून बसला. त्याने हत्तीच्या जवड्यावरून हात फिरविला, व त्याला शांत केले. हत्तीला घेऊन तो राजवाड्यात गेला. संकटाची कसलीही जाणीव त्याच्या साहसी वृत्तीला अडवू शकली नाही. काहींच्या मते या प्रसंगापासूनच लोक वर्धमानाला महावीर म्हणू लागले.



वर्धमानाने मत्त हत्तीला शांत केले.

## विवाह

क्षत्रीय योद्धयांमध्ये महावीरांनी वराच काळ घालविला. त्यांच्याप्रमाणे ते युद्धकला शिकले. ते एक उत्कृष्ट घोडेस्वार व मल्ल झाले. पोहण्यातही त्यांनी प्रावीण्य मिळविले. निरनिराळ्या कलांचा त्यांनी अभ्यास केला. संगीतात तर ते पारंगत होते. शरीरसामर्थ्याबरोवर त्यांचे बुद्धिसामर्थ्यंही विकसित झाले होते. हा विकास सर्वांच्या दृष्टीत भरत होता. पण एक आगळी शक्तीदेखील वाढत होती, आणि ती मात्र कोणीही पाहू शकत नव्हते. ही शक्ती म्हणजे आत्मिक शक्ती होय. ती प्रकट होण्याची वेळ मात्र अजून आलेली नव्हती.

सिद्धार्थ आणि प्रियकारिणी महावीरावर प्रसन्न होते. त्यांचा हा पुत्र वंशाचे नाव उज्ज्वल करणारा होता. तो सर्व सद्‌गुणांची खाण होता. महावीरांनी आपले शिक्षण गुरुकुलात पूर्ण केले. अनुभवाने आपल्या ज्ञानात अधिक भर घातली. महावीर राज्याची सूत्रे सांभाळील असा मातापित्यांना विश्वास उत्पन्न झाला. तो आता

विवाहयोग्यही झाला होता. मग अवधी कशाला ? त्याला राज्य द्यावे व स्वतः संसाराचा त्याग करून जैनधर्माची दीक्षा घ्यावी आणि आपले उरलेले आयुष्य ईश्वराच्या ध्यानचिंतनात घालवावे असे त्यांना वाटू लागले.

ही इच्छा सिद्धार्थ व प्रियकारिणीच्या मनात इतर कारणांनीही बलवत्तर होत गेली. अनेक राजांची व श्रेष्ठींची इच्छा आपल्या कन्येचा विवाह महावीराशी व्हावा अशी होती. अनेक उपवर वधूंच्या चित्रांचा ढीग पसंतीसाठी महावीरासमोर येऊन पडला.

आणि एकदा प्रियकारिणीने त्याच्यासमोर विवाहाची गोष्ट काढली. तिने पसंत करण्यास अनेक कन्यकांची चित्रे त्याच्यापुढे ठेवली. एवढयात सिद्धार्थही तेथे आले. आपल्या नकाराने मातापित्याला दुःखी करण्याची महावीरांची इच्छा नव्हती. ती चित्रे पाहण्यात आपण गर्क आहोत असे त्यांनी भासविले.

मातापित्याप्रमाणे महावीरांवर देखील पार्श्व-

नाथांच्या शिकवणीचा प्रभाव होता. जसा एखादा साधारण मानवप्राणी संसाराच्या मायामोहात गुंतलेला असावा असेच तेही दिसत होते. पण अंतरातून त्यांची धर्मावर श्रद्धा जडली होती व संसारसुखाविषयी उदासीनता निर्माण झाली होती. क्षत्रीय योद्धयात वाढल्यामुळे योद्धयांचे गुण त्यांच्या ठिकाणी एकवटले होते. युद्धप्रसंगाची अंतरातून तयारीही सुरू होती. पण हे युद्ध वेगळ्या प्रकारचे होते. क्रोध, कपट, लोभ आणि संसारासक्ती आदी शत्रूंबरोबर युद्ध छेडण्यास त्यांची जय्यत तयारी सुरू होती. यांच्यावर विजय, तोच खरा विजय असे त्यांचे मत होते. राज्य-शासनाबद्दल त्यांचा दृष्टिकोण भिन्न होता. कल्याणकारी खऱ्या लोकतंत्रावर त्यांचा विश्वास होता. ऐषारामी जीवनाबद्दल मनात नावड होती. असे आयुष्य क्षुद्र व क्षणभंगुर होय असे त्यांना वाटे. शाश्वत जीवनाची मनापासून ओढ होती.

तो भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील कर्मकांडाच्या अतिरेकाचा काळ होता. त्या काळी भिन्नभिन्न देवदेवतांच्या उपासना प्रचलित होत्या.

मूक प्राण्यांचे वलिदान होत होते. त्यांच्या रक्ताचे पाट वाहत होते. मानव दानव वनला होता. यावरोवरच स्पृश्यास्पृश्यतेचा विचार भयंकर थैमान घालीत होता. अत्याचाराखाली अस्पृश्य भरडले जात. स्त्रिया गुलाम होत. या साऱ्या गोष्टींमुळे महावीराच्या डोक्यात काहूर उठले.

दरदिवशी सिद्धार्थ व प्रियकारिणी यांचे विवाहाचे टुमणे महावीरामागे सुरू होते.

महावीरांनी एक योजना आखली. त्यांनी मातापित्यांना कळविले की मी या वर्षी विवाह करणार नाही. तेव्हा ती गोष्ट काढू नका. दोघांनाही ते पटले. पण जेव्हा वर्षामागून वर्षे जाऊ लागली तेव्हा त्यांना संशय येऊ लागला. प्रियकारिणी दु:खित झाली. आपल्या प्रिय पुत्रा-साठी ती मोठ्या हिरीरीने वधू शोधू लागली. यशोदा रूपवती व गुणवती होती. शिवाय कला-भिज्ञ होती. प्रियकारिणीला आपली पुत्रवधू म्हणून ती अतिशय पसंत पडली.

परंतु सिद्धार्थ आपल्या पुत्राला जाणून होते.

जेव्हा महावीरांनी पहिल्यांदा नकार दर्शविला तेव्हाच त्यांनी काय ते ओळखले होते. महावीराच्या आदर्शाची सिद्धार्थाने स्तुतीच केली आणि प्रियकारिणीला देखील याची जाणीव करून दिली.

"आपला महावीर अविवाहित राहू इच्छितो."

"काय ?"

"त्याची संसारी नव्हे तर संन्यासी होण्याची इच्छा आहे."

"हे परमेश्वरा, मी हे कसे सहन करू ?" प्रियकारिणी उद्‌गारली व बेशुद्ध पडली. पिता-पुत्रांनी तिला शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न केले. ती हळुहळू शुद्धीवर आली. पण मन मात्र अतिशय दुःखी झाले. त्याच वेळी दोन महर्षी संजय आणि विजय तेथे आले. ते जैनग्रंथाचे अध्ययन करीत होते. महावीरांकडे काही शंकासमाधान करण्यास त्यांना यावे लागले. वर्धमानांना पाहिल्याबरोबर त्यांच्या शंका दूर झाल्या. तेव्हा त्या ऋषींनी

महावीराला 'सन्मति' संबोधून त्याची प्रशंसा केली.

प्रियकारिणीने त्या ऋषींची विनवणी केली की त्यांनी महावीराला विवाह करून इतराप्रमाणे संसारी जीवन घालविण्याचा उपदेश करावा. ऋषी म्हणाले, "आपण हे काय म्हणत आहात? अनेक जन्माचे पुण्य म्हणून हा पुत्र तुम्हाला लाभला. आपण याच्या मार्गातली बाधा बनू नका. हा तिन्ही लोकांना मार्ग दाखवील."

"मग महाराज मी काय करावे?" प्रियकारिणीने विचारले.

"आपण महावीराला आशीर्वाद द्या. तपाची अनुज्ञा द्या."

"पण माझा हा सुकुमार तपाच्या हाल-अपेष्टा कसा सहन करील?"


"तो समर्थ आहे. त्याला महावीर म्हणतात ना? तपासाठी नुसते शारीरबळच नव्हे, तर

आत्मिक शक्तीची आवश्यकता असते. आपण त्याला फक्त आशीर्वाद द्या," ऋषी म्हणाले.

महावीरांनी आईला साष्टांग नमस्कार केला. समुद्रासारख्या धीरगंभीर वाणीने ते म्हणाले, "आई, तू सारे जाणतेस. तू माझी आई आहेस. तुझ्या पोटी मी जन्म घेतला. हा संसार नुसती माया आहे. येथील सारे पदार्थ, येथे लाभणारे जीवन पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे क्षणजीवी आहे. दुःख, व्यथा व रोगराई यांनी भरलेल्या या संसारात सुख, आनंद आहे तरी कुठे ? मी आत्मज्ञानाच्या शोधास जात आहे. दया कर आणि मला तुझा आशीर्वाद लाभू दे."

इ. सनापूर्वी ५६९ वे वर्ष. भारतीय काल-गणनेप्रमाणे माघ कृष्ण दशमी. संसारबंधने तोडून महावीर तपश्चर्या करण्यास निघाले. त्यांनी आप्तपरिवार, धनसंपत्ती, राजमहाल यांचा त्याग केला. त्यांच्या ध्येयापुढे हे सर्व तृणवत् होते.

महावीरांना निरोप देण्याकरिता कुंडपुरातील सारे लोक एके ठिकाणी जमले. जिथे महावीरांचा



तीर्थंकर महावीर धम

9329



दीक्षा देत असताना.

जन्म झाला तो हाच महाल ! इथेच ते लहानाचे मोठे झाले. ज्यावरून ते फिरले, ते हेच मार्ग आणि जिथे ते खेळले, नाचले, वागडले, ती हीच उपवने. महावीरांच्या दर्शनास, त्यांच्यावर पुष्पवर्षाव करण्यास सारे, सारे जमले होते. याच विशाल वटवृक्षावर बाळपणी त्यांनी सर्पराजाला पिटाळले होते. इथेच त्यांनी मत्त हत्तीला काबूत आणले होते. बालपणच्या स्मृती चाळविणारी ही स्थाने महावीरांनी पार केली. एकदा मागे वळून पाहिले आणि मातापित्याच्या चरणी त्यांची दृष्टी स्थिरावली. पुन्हा एकदा त्यांनी साष्टांग नमस्कार केला. मातेचे अश्रुबिंदू त्यांच्या मस्तका-वर पडले. आत्मलाभास्तव संसारातील कित्येक गोष्टींचा त्याग करावा लागतो. महावीरांनी विचार केला की राज्याभिषेकासाठी अभिषेकादि विधी करावेच लागतात. तपरूपी सिंहासनावर आरूढ होण्यापूर्वी हा अश्रूंचा अभिषेकही आवश्य-कच होता.

सर्वांना महावीरांनी प्रणाम केला. ते पालखीत बसले. हजारो कंठातून त्यांच्या तप:सिद्धि-

करिता जयघोष निनादला. कुंडपुरच्या लोकांत त्यांची पालखी वाहून नेण्याची चढाओढ लागली. हत्ती, घोडे आणि रथ शृंगारून मागोमाग निघाले. कुंडपुराने राजोचित सन्मानाने महावीरांना निरोप दिला.

**संन्यासी**

कुंडपुराच्या एका सीमेवर शांदवन नामक उपवन होते. त्यात एक हरितपर्ण अशोकवृक्ष होता. त्याच्याजवळ पालखी ठेवली. तीतून महावीर उतरले. पूर्व दिशेकडे मुख करून उभे राहिले. मग एका संगमरवरी शिलेवर बसले. गळ्यातील पुष्पमाळा व स्वर्णाभरणे काढली. शरीरावरची सुंदर बहुमूल्य वस्त्रेदेखील काढून एकीकडे ठेवली. आता त्यांना देहाची किंचितही आसक्ती उरली नव्हती. सुखसोयींची काहीही गरज नव्हती. एका जैन संन्याशाने आपल्या हातानी त्यांचे मुंडन केले. आपला सुंदर व विपुल केशसंभार त्यांनी स्वतःच बाजूला केला. बरोबर आलेले नगरजन परतू लागले. सिद्धार्थ आणि प्रियकारिणीदेखील परत फिरले. तो पुत्रविहीन राजवाडा आता त्या मातेला

तुरुंगाप्रमाणे वाटू लागला. तिने यशोदेची तिच्या मातापित्याकडे पाठवणी केली. (श्वेतांबर जैनांच्या मते महावीरांचा यशोदेबरोबर विवाह झाला होता व त्यांना एक कन्यारत्नही प्राप्त झाले होते.)

महावीरांनी अडीच दिवस उपवास केला. पाण्याचा एक थेंबही घेतला नाही. इहलोकाहून एका वेगळ्याच जगात ते निघून गेले होते. हे त्यांचे एकान्त जीवन होते. इ. स. पूर्व ५६९ ते ५५७ पर्यंत बारा वर्षे ते संन्यासी होते. त्यांचा कोणी गुरू नव्हता. पार्श्वनाथांची शिकवण त्यांना मार्गदर्शक झाली. त्यांच्याप्रमाणे कठोर संन्यासी जीवन त्यांनी घालविले. त्यांना देहाची आसक्ती नव्हती, त्यांच्या रक्षणाची चिंता नव्हती. आत्मज्ञानावर त्यांचे मन केन्द्रित झाले होते. एका स्थानी ते फार काळ निवास करीत नसत. त्यांच्याजवळ काहीही नव्हते.

ते दिगंबर अवस्थेतच असत. त्यामुळे त्यांना किडे चावे घेत, माशा शरीराभोवती घोंघावत. परंतु तिकडे त्यांचे लक्ष नसे. कधीही त्यांनी किडे किंवा माशांना हाकलले नाही. त्यांचेदेखील जीवन

आहे. कोणत्याही जीवाला दु:ख देऊ नये हीच भावना त्यांच्या मनी होती.

त्यांचे नागवेपण लोकांच्या कुचेष्टेचा विषय होई. हीन विचार करणाऱ्यांनी त्यांची निंदा करावी. कुचेष्टेखोरांनी त्यांना पाहून शीळ वाजवावी. मूर्खांनी त्यांना मारावे, बदमाषांनी त्यांच्यावर दगड भिरकावेत. पण महावीरांनी सर्वांना क्षमा केली. त्यांच्यात असीम क्षमाशीलता होती. आपल्याला होणाऱ्या त्रासाबद्दल त्यांची काहीच तक्रार नसे. या दुराचाऱ्यांना त्यांनी ना शाप दिला, ना त्यांचा सूड उगवला. एका शब्दानेही त्यांना महावीरांनी दुखविले नाही.

अशा प्रकारे काळ व्यतीत होऊ लागला. महावीरांनी मौनव्रत घेतले. आत्मसाक्षात्कारा-प्रीत्यर्थ सर्व गोष्टींचा त्यांना विसर पडला. जनसंपर्कही त्यांनी टाळला. काही त्यांचे निंदक बनले, तर काहींनी त्यांचा सन्मान केला. परंतु दोघांनाही महावीरांनी समान लेखले. ज्यांनी त्यांची निंदा केली त्यांच्याविषयी महावीरांना क्रोध

वाटला नाही, किंवा त्यांनी स्तुति करणाऱ्यांचा पक्षही घेतला नाही. कोणत्याही विकाराने त्यांचे मन विचलित झाले नाही. पुष्कळांनी त्यांच्याबरोबर वाद घातला, प्रश्न विचारले, पण महावीरांनी मौन सोडले नाही.

## कठोर तप

त्यांनी श्रेष्ठ ज्ञान मिळविण्याची प्रतिज्ञा केली होती. कर्मवाद व त्याचा प्रभाव नष्ट करण्याचा निश्चय केला होता. त्याकरिता कठोर तप, ईश-प्रार्थना व ईश्वर-चिंतन सुरू ठेवले. प्रमाद न करता हे चालू होते. ते पूर्णपणे पवित्र होते. चित्तैकाग्र साधून तप करणे म्हणजे असिधारा-व्रत होय. महावीरांनी अहोरात्र ते पाळले. दिवसा ते पर्यटन करायचे व रात्री कुठेतरी वस्तीला राहायचे. रात्रीचे स्थान ठराविक नसे. सुगंध किंवा दुर्गंध त्यांना सारखाच असे.

रात्री जेथे ते पोहोचत तेथेच वस्ती करीत. मग ती झोपडी असो की वृक्षच्छाया, गाव असो की नगर, स्मशान असो की उपवन, त्यांना सारे सारखेच. त्यांना काय सुखनिद्रेची इच्छा होती ?

कधीही ते ७-८ तास झोपले नाहीत. मोठ्या मुश्कीलीने त्यांना ४-५ तास झोप मिळे. कधी-कधी तर १-२ तासच झोपायला मिळे. थंडीच्या दिवसांतही पांघरायला चादरदेखील ते घेत नसत. वादळवाऱ्यातही ते एखाद्या वृक्षाच्या खाली प्रार्थना करीत. इतकेच नव्हे तर, उन्हाळ्यातदेखील असाच दिनक्रम असे. त्यांचे उघडेनागडे शरीर सूर्याच्या उन्हाने काळेठिक्कर पडले. त्यांनी उटणे आदींचा उपयोग केला नाही. शरीर कधी हाताने देखील चोळले नाही. खाज सुटली तरी खाजवले नाही. ते स्नानदेखील करीत नसत. जखमांवर औषधीयोजना त्यांनी कधी केली नाही.

## भोजन

ते मिताहारी होते. जवळ कसलीही भांडी नव्हती. मग खायचे कसे? हातच त्यांची भांडी होती. खाण्याच्या बाबतीत ते कठोर नियम पाळीत. आपल्या क्षुधा-शमनासाठी कोणालाही कष्ट देत नसत. खास त्यांच्याकरिता म्हणून केलेल्या खाद्यपदार्थांना ते स्पर्शही करीत नसत. त्यांना स्वादिष्ट जेवण नको असे. दिवसातून ते

एकभुक्त राहत. त्यानंतर दुसऱ्या दिवशीच्या जेवणापर्यंत पाण्याच्या थेंबालाही स्पर्श करीत नसत. भिक्षेच्या नियमांचे कठोर पालन करीत. चालताना काही कीडामुंगी पायाखाली न येवो म्हणून दहा फूट भूमीचे ते निरीक्षण करायचे. कधी त्यांनी क्षुधापीडित पाखराला पाहिले की ते स्वत: जेवायचे नाहीत. एखादा तहानलेला प्राणी दृष्टीस पडला की ते उपवास करायचे. कुत्रा किंवा मांजर आडवे गेले की परत फिरायचे. अशा कठोर नियमांमुळे कधी-कधी त्यांना १२–१२ दिवसांचे उपवास घडत. तसाही साधारणपणे ६–७ दिवस त्यांना उपवास घडत असे. याप्रमाणे कधी महिन्याभराचा उपवासही घडे. प्रेमाने आमंत्रण देणाऱ्याच्या घरी ते जेवत. प्रासाद–पर्णकुटी त्यांना समानच होती. गृहस्थ-परिवार जर शाकाहारी असेल तर त्यांना विशेष आनंद वाटे. इतकेच नव्हे तर खाद्यपदार्थांत एक जरी मांस-वर्जित पदार्थ असेल तरी त्यांना आनंद होई. स्वादिष्ट भोजनापेक्षा स्वच्छतेला त्यांच्या दृष्टीने अधिक महत्त्व होते. त्यांचा आहार अल्प असे. तोही कसा ? आसनावर किंवा गालीच्यावर आरामशीर बसून ?

स्वर्णपात्रात की चांदीच्या? ह्या साऱ्यांचेच काही महत्त्व नव्हते. जन्मापासून लाभलेले भांडे म्हणजेच आपले हात. त्यांचा उपयोग ते भांड्याप्रमाणे करीत. उभे राहूनच जेवीत. लोक आनंदाने जे जेवण देत तेच त्यांना पुरेसे असे. त्याचे प्रमाण व दर्जा याला ते कोणताही नियम लावीत नसत. त्यांचे यजमान आपल्या घरासमोर उभे राहात व त्यांना प्रार्थनापूर्वक निमंत्रित करीत. जर महावीर थांबले तर त्याचा अर्थ आपल्या प्रार्थनेचा स्वीकार झाला असा लावीत. यजमान प्रथम दरवाजासमोर त्यांचे पाय धूत. मग आत प्रवेश करीत असताना हात धूत. नंतर उभे राहूनच उजवा तळवा डाव्यावर ठेवीत. त्यांचा उजवा हात ताट, वाटी व चमच्याचे काम करी. यजमान खाद्यपदार्थांचे लहान घास त्यांच्या हातावर ठेवीत. आणि महावीर आपल्या बोटांनी त्यात किडा किंवा केस चाचपडून पाहत. जर ते असतील तर त्याच वेळी भोजन वर्ज्य करून, हात धुऊन मुकाट्याने पुढे चालू लागत. त्या दिवशी त्यांना उपवास घडे. नंतर ते दुसऱ्याच दिवशी भोजनाचा शोध घेत.

संन्यास–ग्रहणानंतर सहा महिनेपर्यंत त्यांनी काहीच खाल्ले नाही. हा त्यांचा दीर्घावधी उपवास होय. त्यानंतरच त्यांनी भिक्षा मागायला सुरुवात केली. कुलपूरच्या मुखियाने त्यांना प्रथम भिक्षा घातली. महावीरांनी १२ वर्षे ५ महीने १५ दिवस तप आचरले. या काळात त्यांनी फक्त ३४९ वेळा भोजन केले. कोणा एका ठिकाणी ते जास्त थांबत नसत. ठिकठिकाणी भटकत असत. एका गावात दिवसभर थांबत. नगरात चार दिवस व अरण्यात दहा दिवस थांबत. पावसाळ्यात मात्र एके ठिकाणी वस्तीला असत. तो त्यांचा चातुर्मासयोग होय. प्रथम चातुर्मास त्यांनी अस्थिग्रामात केला. ते स्थान बंगालमध्ये आहे. हल्ली त्याला बरद्वान म्हणतात. महावीरांना कधी क्रोध, गर्व आणि कपट यांचा अनुभव नव्हता. लोभ तर त्यांच्या ठिकाणी नव्हताच. त्यांच्या मनात नित्य शांती असे. ते आकाशवत् आत्मनिर्भर राहात. सागराप्रमाणे गंभीर, चंद्राप्रमाणे सौम्य. सर्वस्वत्यागी मानवाला भीती कसली ? अस्थिग्रामाच्या वेशीजवळ शूलपाणीचे देऊळ आहे. रात्री त्या देवळात कोणी जात नसे. दिवसादेखील

तिथे जायला लोक घाबरत. त्या मंदिरात प्रेतात्मा राहात असे. महावीर शूलपाणीच्या मंदिरात राहिले, तेव्हा त्या प्रेतात्म्याने त्यांना अतोनात त्रास दिला. त्यांनी आपले चातुर्मास सिद्धग्राम, वैशाली, वणिजग्राम व श्रावस्ती आदि ठिकाणी घालविले.

तपश्चर्येचा हा मार्ग कठीण आहे. यात अडथळे अनेक येतात. उत्तरभारतात काही संन्यासमार्गीयांनी विघ्ने आणली. त्यांच्या गटाने महावीरांना त्रास देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी संयमाने व नियमांनी ह्या विघ्नांवर मात केली. इथेच त्यांची सत्त्व-परीक्षा संपली नाही. त्यांना याशिवाय दोन दिव्यातून पार पडावे लागले. त्यांनी आपला अकरावा चातुर्मास श्रावस्तीत घालविला. दुष्टांच्या संगतीने, संगमक नावाच्या व्यक्तीने त्यांना अतिशय त्रास दिला. प्रत्येक ठिकाणी महावीरांबरोबर जाऊन त्याने कित्येक महिने त्यांना छळले. स्वत:ला तो महावीरांचा शिष्य म्हणवीत असे. घराघरांत त्याने चोरी करावी, स्वत:ला पकडून घ्यावे व वर सांगावे की महावीरांच्या आज्ञेने मी चोरी केली.

काहींनी, यामुळे महावीरांना ढोंगी म्हटले व त्यांना दंड भोगावा लागला. संगमकाचा जाच इथेच संपला नाही. महावीरांनी भिक्षा मागितली की त्याने कावळ्यासारखा आवाज काढावा. ते जेव्हा जेवायला बसत तेव्हा त्यांच्यासमोर जावे. जेव्हा दुसऱ्या दिवशी महावीर भिक्षेसाठी निघत तेव्हा त्यांच्या अगोदर जाऊन भिक्षा मिळण्यापासून त्यांना वंचित करावे. तसेच एके दिवशी महावीर मुखात घास घालण्याच्या ऐनवेळी स्वयंपाक घरातून त्याने मांजरीचा आवाज काढला. महावीरांना भोजनाचा त्याग करावा लागला. ते या विघ्नांनी त्रस्त झाले. परन्तु त्यांच्या शरीरावर स्वर्णकांती चढली. संगमक पराजित झाला. आपले तोंड काळे करून तो पळून गेला.

महावीर उज्जयिनीत आले. वेशीशेजारी अतिमुक्त नावाचे भयानक स्मशान होते. तेथे थांबण्याचे कोणाला धैर्य होत नसे. महावीरांना तेथेच संध्याकाळ झाली. आता रात्र त्या स्मशानात काढणे भाग होते. त्यांनी ईशप्रार्थना सुरू केली. सर्वत्र अंधाराचे साम्राज्य होते. वादळ


उठले व आकाशात विजा चमकू लागल्या. हिंस्र प्राण्यांनी महावीरांभोवती कोंढाळे केले. वाघ-सिंहांच्या गर्जना ऐकू येऊ लागल्या. चित्त्यांचा आरडाओरडा उठला. सापविंचू आसपास फिरू लागले. परन्तु महावीरांनी मौनव्रत सोडले नाही. भयंकर प्रेतात्म्यांच्या आकृती दिसू लागल्या. पण त्यांना ते घाबरले नाहीत. प्रभात झाली, त्या भयानक रात्रीही त्यांचे शांत चित्त विचलित झाले नाही.

महावीरांनी आपला बारावा चातुर्मास कौशाम्बी नगरीत व्यतीत केला. तेथे केलेला उपवास 'अभिग्रह' म्हणून विख्यात आहे. उपवाससमाप्तीच्या दिवसापासून त्यांनी भिक्षा मागायला सुरुवात केली. एक आवाज त्यांच्या कानी पडला, "हे श्रेष्ठ साधो, थांब" तो एका स्त्रीचा आवाज होता. तिने महावीरांना थांबायचा आग्रह केला. जेथून तो आवाज आला तिथे जाऊन महावीरांनी पाहिले की ती चेतक राजकन्या चंदन होती. अविवाहित राहून ती शुचिर्भूत जीवन व्यतीत करीत होती. जैन

धर्मावर तिची पूर्ण श्रद्धा होती. उग्र जीवन स्वीकारल्यामुळे तिची स्थिती वरी नव्हती पण धर्मावर तिची आस्था होती. तिच्याजवळ दूध तूप किंवा फळेही नव्हती. चंदनने महावीरांना निकृष्ट तांदळाचा भातच काय तो दिला. प्रसन्न मनाने त्याचा महावीराने स्वीकार केला. त्यामुळे चंदनचा आनंद आकाशात मावेना.

## तीर्थंकर

महावीर पुढे चालले. ते जृंभिका ग्रामी पोचले. ऋजुकूला नदी गावाजवळून वाहत होती. एका वृक्षाखाली ते आसनस्थ झाले. आराधनेत व प्रार्थनेत ते इतके तल्लीन झाले की भोवतालच्या जगाचे भान त्यांना मुळीच उरले नाही. इ. स. पूर्व ५५७ व्या वर्षाच्या ग्रीष्माचा दुसरा मास होता. भारतीय पंचांगाप्रमाणे वैशाख शुक्ल दशमी. दोन प्रहरीचा समय. छाया पूर्वेकडे सरकत होत्या. पर्यंकासन मुद्रेत बसलेले महावीर. तत्क्षणी दिव्य ज्ञानाची त्यांना अनुभूती झाली. सृष्टीतील प्रत्येक पदार्थ जाणण्याची क्षमता त्यात होती. महावीर तीर्थंकर झाले. त्यांचे वय तेव्हा ४१ वर्षे ९ महिने



ध्यानमग्न महावीर

५ दिवसांचे होते. जिथे तीर्थंकराचा निवास असतो त्या स्थानाच्या ४०० मैलाच्या परिसरात दुष्काळ पडत नाही. चालताना प्राणिहिंसा घडू नये याची ते काळजी घेत. त्यांच्या मुखाचे दर्शन चारी बाजूंनी होत असे. सर्व प्रकारचे ज्ञान त्यांना प्राप्त झाले. त्यांच्या शरीराची सावली पडत नसे. पापण्या लवत नसत. नखे व केस वाढत नसत.

**मार्गदर्शन**

तीर्थंकर पदवी प्राप्तीनंतर महावीरांनी जन-सामान्यांना धर्माचा मार्ग दाखविला. त्यांनी शिष्यांचा एक संघ स्थापन केला. त्यांचा मुख्य सिद्धांत 'पंचव्रत' होय. ही व्रते लहान प्रमाणावर गृहस्थांसाठी आहेत. म्हणून त्याला 'अणुव्रत' म्हणतात. मात्र संन्याशांसाठी ती मोठ्या प्रमाणावर असून त्यांचा 'महाव्रत' असा निर्देश केला आहे. पंचव्रत म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह.

अहिंसेचा अर्थ प्राणिमात्राला दु:ख न देणे; त्यांना दु:ख देणाऱ्या गोष्टींचा विचारदेखील मनात

न आणणे; पशुपक्ष्यांवरही प्रेम करणे. सत्य म्हणजे खोटे न बोलणे; आणि क्रोध व तिरस्कार यांचा त्याग करणे. अस्तेय म्हणजे चोरी न करणे. दुसऱ्याच्या संपत्तीचा लोभ न बाळगणे. ब्रह्मचर्य म्हणजे केवळ अविवाहित राहणे नव्हे तर विवाहितांनी देखील संयम पाळावा व पति–पत्नींनी अन्यत्र मातापित्याची भावना ठेवावी. अपरिग्रह म्हणजे आपल्या गरजेप्रमाणे संग्रह करणे. यात वस्त्रे, भूषणे, धनसंपत्ती वगैरे येतात. गरजेपेक्षा जास्तीच्या वस्तू दुसऱ्या गरजूंना देणे, असा या व्रताचा अर्थ आहे.

महावीरांनी समाजात चार वर्ग पाडले: संन्यासी, संन्यासिनी, गृहस्थ (विवाहित पुरुष) व गृहिणी (विवाहित स्त्री), त्याला 'चातुर्वर्ण्य संघ' असे नाव दिले. महावीरांनी मानवाला मोक्षमार्ग दाखविला. ते म्हणतात–'सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान, आणि सम्यक् चरित्र मोक्षमार्गाचा निर्देश करतात. सम्यक् दर्शन म्हणजे तीर्थंकरांच्या उपदेशाकडे ध्यान देणे व सम्यक् ज्ञान म्हणजे तो उपदेश समजून त्यावर श्रद्धा ठेवणे व सम्यक्

चरित्र म्हणजे नीति-नियमांचे पालन.

महावीरांनी प्राणिमात्रावर प्रेम केले. सारे मानव समान आहेत अशी त्यांची भावना होती. त्यांनी जाती, धर्म, पंथ, उपपंथ, यावर टीका केली. जन्माने भिन्नता येत नसते, कार्याने येते.

या उपदेशांचे स्वत: आचरण केल्यानंतर महावीरांनी त्यांचा प्रचार केला. ते एकदा सद्दल नावाच्या कुंभाराकडे अतिथी म्हणून गेले. तेव्हा-पासून त्या कुंभाराचे जीवन पालटून गेले. हरीकेशी नावाच्या अंत्यजाला त्यांनी जैनसाधु–समाजात प्रतिष्ठेचे पद दिले. " सरस्वती, विद्येची देवता, हीच सर्व भाषांची जननी होय. त्यामुळे सर्व भाषा समान आहेत." अशी त्यांची भावना असल्यामुळे बहुजन समाजाच्या भाषेलाच त्यांनी आपल्या उपदेशाचे माध्यम केले. सज्जनांना त्यांचा उपदेश सर्वोदय तीर्थाप्रमाणे वाटत असे.

**प्रभाव वाढला**

महावीरांच्या पहिल्या विजयाला ' महाविजय इंद्रभूती ' म्हणतात. इंद्रभूती महावीरांचा शिष्य

बनला. इंद्रभूतीला यज्ञ करून त्यात विविध वली देण्याची अतिशय इच्छा होती. पावापुरात त्याने पहिल्या यज्ञाची तयारी केली. महावीराच्या एका शिष्याने तेथे जाऊन इंद्रभूतीला जैनधर्माच्या शिकवणीवर आधारित असलेले काही प्रश्न विचारले. इंद्रभूती त्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकला नाही.

"हे सारे तुम्हाला कोणी शिकविले ?" इंद्रभूतीने विचारले.

"महावीरांनी" शिष्याने उत्तर दिले.

"कुठे आहेत ते ?"

"आता याच नगरात आहेत !"

"माझ्यावरोवर चल. मी त्यांच्याशी चर्चा करीन." इंद्रभूती शिष्यांबरोवर महावीरांकडे आला.

महावीरांची वाणी 'दिव्य वाणी' होती. त्या 'दिव्य वाणी'त सर्व भाषांचे सार असे.

प्रत्येकाला त्या वाणीतील उपदेश आपल्या भाषेत ऐकू येई. तेथे समवसरण मंडपात मानस्तंभ नावाचा एक खांव होता. इंद्रभूतीने तो पाहिला. तत्काळच त्याचे गर्वहरण झाले. त्याच्या सर्व शंकांचे समाधान झाले. त्यानंतर महावीरांशी त्याची भेट झाली. वराच काळ त्यांची चर्चा चालली. इंद्रभूतीने महावीरांचे महात्म्य ओळखले व यज्ञसंबंधी आपल्या विचारांचा त्याग केला. एवढेच नव्हे तर, आपल्या ४४०० शिष्यांसमवेत जैनधर्म स्वीकारला. काही काळानंतर इंद्रभूती महावीरांचा मुख्य शिष्य वनला. तो तीर्थंकर महावीरांच्या उपदेशाचे मर्म लोकांना समजावून सांगू लागला. महावीरांचा विजयध्वज भारताच्या कोनाकोपऱ्यात फडकू लागला.

बुद्धदेव देखील महावीरांचे समकालीन महान धर्मोपदेशक होते. महावीरांनी भारतवासीयांना अहिंसा शिकविली. त्यांनी स्त्रीजातीचा सन्मान व समानता यावर भर दिला. त्यांनी सांगितले की, स्त्रियांना धार्मिक व सामाजिक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने अधिकार आहेत. याच पायावर

भिक्षुणींच्या संघाची स्थापना झाली. चंदनबाला याची प्रधान होती. ती ३६००० भिक्षुणींच्या कार्यकलापाची देखरेख करीत असे. महावीरांचा संघ विस्तृत होता. त्यात १४००० भिक्षू होते. एक लाख, पन्नास हजार श्रावक होते व श्राविका तीन लाखापर्यंत होत्या.

## हिमालयाची उत्तुंगता

महावीरांनी ३२ वर्षे धर्मप्रसाराचे कार्य केले. त्यांना इ. स. पूर्व ५२७ व्या वर्षी निर्वाण-प्राप्ती झाली. त्यावेळी त्यांचे वय ७१ वर्षे, ३ महिने, २५ दिवसांचे होते. दीपावलीच्या दिवशी महावीरांना निर्वाणपद प्राप्त झाले. जैन दीपा-वलीला महावीरांचा निर्वाण-दिवस पाळतात.

धर्माच्या तत्त्वांवर प्रकाश टाकणाऱ्या एका महान धर्मसंस्थापकाचे त्या दिवशी निर्वाण झाले हे ऐतिहासिक सत्य आहे. परन्तु त्याने घालून दिलेले आदर्श व नियम मात्र अमर आहेत धर्मसंस्थापकांची स्मृती चिरंतन राहते. सत्ताधारी राजांना समाज विसरून जातो. राजा केवळ आपल्या

प्रजेचे कल्याण करतो पण धर्मसंस्थापक सर्व प्राणिमात्रांचे कल्याण साधतो. महावीरांनी संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची काळजी वाहिली. दुसऱ्यांच्या कल्याणासाठी आपले जीवन झिजविले.

महावीरांचे आदर्श जीवन उघडच्या ग्रंथाप्रमाणे आहे. ते म्हणत की कुणीही त्यांचे अनुकरण करू शकतो. अनुकरणाने आपले ध्येय गाठू शकतो. त्यांच्याएवढे आपलेही जीवन उंचावू शकतो. जणूकाही उंच जाण्यासाठी त्यांनी पायऱ्या रचून ठेवल्या आहेत. निर्वाणाचा दरवाजा उघडा केला आहे. त्यातून कोणीही इच्छुक आत प्रवेश करू शकतो. कोणत्याही दिव्याला ते घाबरले नाहीत, संकटांना भ्याले नाहीत. निर्भय होऊन हिमालयासारखे अचल राहिले व शेवटी स्वतःच उत्तुंगतेचा हिमालय झाले !

BVBK-0401321

9329 दि. ६।१।८२

॥ श्री ॥

# भारत - भारती

## बाल-पुस्तकमाला

(मराठी)

१. स्वामी विवेकानंद
२. स्वातंत्र्यवीर सावरकर
३. पं. दीनदयाल उपाध्याय
४. नचिकेता
५. भगिनी निवेदिता
६. वीर अभिमन्यू
७. विश्वामित्र
८. लाला लजपतराय
९. महासती द्रौपदी
१०. संत गुलाबराव महाराज
११. गुरुपुत्र फतेहसिंह, जोरावरसिंह
१२. छत्रपती शिवाजी
१३. बाहुबली
१४. भगवान महावीर
१५. डॉ. आंबेडकर

⊙

---

किमत प्रत्येकी रुपये २–००

विविधतेत एकतेचे दर्शन
भाषिक एकात्मतेचा अनुभव

# "गीत - भारती"

आपल्या देशातील १४ भाषांमधील ६६ राष्ट्रीय गीते
देवनागरी लिपीत
सोबत त्यांचा हिन्दी भावार्थ

आकार १/८ क्राऊन : पृष्ठ-संख्या १५०

मूल्य केवळ रु. ४–५०

प्राप्ति-स्थान
**भारत–भारती**
बाल-पुस्तकमाला
रुईकर पथ, नागपूर–४४० ००२